(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XI / Issue – I ISSN 2277-8063

# सामाजिक सलोख्यासाठी स्थापलेला सामाजिक समरसता मंच

**प्रा.दादासाहेब दामोदर हाके** राज्यशास्त्र विभागप्रमुख कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा ता.माढा, जि.सोलापूर

---

**प्रास्ताविक :**

सामाजिक समरसता मंच हा जातीय व धार्मिक सलोख्यासाठी स्थापन करण्यात आलेली एक संस्था आहे. सामाजिक समरसता मंच संघटना दलित समाजात हिंदू अस्तित्वभान पसरवते. तसेच दलित समाजाचे सामाजिक व राजकीय एकसंघीकरण करते. यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे वैचारिक योगदान हिंदू समाजसुधारणा या स्वरूपात मांडले जाते. देशामध्ये कोणत्याही आपत्ती अथवा दुर्घटनेच्या वेळी तेथे सहाय्य करण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक पंथ, भाषा, प्रांत आणि जाती, धर्म या कशाचाही विचार न करता मानवतेच्या दृष्टीने तेथे सर्वप्रथम कार्य करतात हे तर सर्वज्ञात आहेच. सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांनी आणीबाणी उठवल्यानंतर लगेचच समरसता मंचाची स्थापना केली नाही. या काळात संघांतर्गत काही महत्वाचे बदल घडत होते. भिकू इदाते, रमेश पतंगे, सुखदेव नवले यांच्यासारखे बहुजन समाजातले कार्यकर्ते संघाच्या महत्वाच्या पदावर स्वकर्तृत्वाने जाऊन पोहोचले होते. संघात कोणाही कार्यकर्त्यांच्या जातीचा अजिबात विचार केला जात नाही. कार्यकर्त्यांचे कर्तृत्व, संघनिष्ठा, संघटन कौशल्य याच्या बळावर एखादा कार्यकर्ता महत्पदाला पोहोचतो. 1978-79 साली नवले, पतंगे, इदाते हे विभाग स्तरावरचे कार्यकर्ते झाले. संघातील या तिघांच्या कर्तृत्वाचे परीघ वेगवेगळे आहेत.

रा.स्व.संघाचे अखिल भारतीय कार्यकर्ते, ज्येष्ठ प्रचारक, श्रेष्ठ विचारवंत श्री.दत्तोपंत ठेंगडी यांचे महाराष्ट्रातील सामाजिक घडामोडींवर बारीक लक्ष होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा त्यांना सहवास लाभला होता. महाराष्ट्रातील दलित समस्येविषयी त्यांचे स्वतंत्र चिंतन चालू होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर या विषयावर त्यांचे बौध्दिक वर्गही झाले होते. त्यांच्या बौध्दिक वर्गातून संघ स्वयंसेवकांना डॉ.बाबासाहेबांच्या जीवनाचे अनेक पैलू समजू लागले होते. वर उल्लेख केल्याप्रमाणे 1983 साली दत्तोपंत ठेंगडी यांच्या नेतृत्वाखाली पुण्याला ‘सामाजिक समरसता मंचा’ची स्थापना झाली. समरसता मंचाच्या कामाला संघटनात्मक पातळीवर सुरूवात करावी आणि मंच म्हणून त्याला काही आकार द्यावा. यासाठी एप्रिल 1985 ला संभाजीनगर येथे काही प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक झाली. याच बैठकीत समरसता मंचाची विचारधारा मांडणारी सामाजिक समरसता मंच पत्रिका दरमहा प्रकाशित करावी असे ठरले. संपादनाचे काम रमेश पतंगे यांच्याकडे देण्यात आले. 1974 साली सुरू झालेल्या विचारांचा प्रवास 1985 साली संस्थारूप घेवून उभा राहिला. सामाजिक समरसता मंच संघटनेची रचनेमध्ये अस्थायी समिती अंतर्गत प्रांत समरसता मंडळ, जिल्हा समरसता मंडळ, जिल्हा समरसता संयोजन मंडळ व तालुका समरसता संयोजन मंडळ अशा प्रकारच्या मंडळांचा समावेश होतो. तसेच भटके विमुक्त परिषद, भटके विमुक्त प्रतिष्ठान समरसता साहित्य परिषद, भारतीय समाज विकास व संशोधन केंद्र आणि सामाजिक समरसता प्रतिष्ठान अशा संस्थांचा समावेश होताना दिसतो.[1]

1985 साली समरसता मंचाच्या कामाला संस्थारूप देऊन जरी सुरूवात करण्यात आली, तरी मंचाची कार्यपध्दती, कार्यक्रम, विविध सामाजिक घटनांविषयीच्या भूमिका इ. सगळयाच गोष्टींबाबत सुस्पष्ट रूपरेखा होती असे नाही. संघाच्या पध्दतीनुसार संघाचे कार्यकारी मंडळ, एखाद्या संस्थेने अमुक कार्यक्रम करावा असे सूचवितही नाही. संस्थेला स्वतःचे कार्यक्रम स्वतः ठरवावे लागतात आणि स्वतःची पोथी स्वतःला निर्माण करावी लागते. रेडिमेड असे काही संघाकडून मिळत नाही. मंचाचे कार्य दोन पातळयांवर सुरू झाले. पहिली पातळी होती वैचारिक प्रबोधनाची आणि दुसरी पातळी होती, कार्यक्रमाची. वैचारिक प्रबोधनाची आघाडी मुख्यतः भिकूजी इदात, दामूअण्णा दाते, रमेश पतंगे, सुखदेव नवले यांनी सांभाळली. समरसता मंचाचे कार्यक्रम महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थितीला योग्य प्रतिसाद देणारे ठरले आहे. 1989 साली पुण्याला पहिल्या समरसता परिषदेचे आयोजन करण्यात आले. हिंदुत्ववादी भूमिकेवरून सामाजिक प्रश्नांचा विचार करणारी स्वातंत्र्योत्तर काळातील बहुधा ही पहिलीच परिषद असावी. डॉ.गंगाधर पानतावणे यांच्या उपस्थितीमुळे आणि भाषणामुळे ही परिषद गाजली. सामाजिक समरसता मंच हे नाव सर्वदूर गेले. 1990-91 साली डॉ. बाबासाहेब आंबेडर जन्मशताब्दी आणि महात्मा फुले स्मृतीशताब्दीनिमित्त फुलेवाडा पुणे ते दीक्षाभूमी नागपूर अशी नऊ हजार किलोमीटरची, सर्व जिल्हयांतून जाणारी संदेशयात्रा काढण्यात आली. या यात्रेमुळे ‘समरसता मंच’ हे नाव खेडोपाडी पोहोचले. या सर्वात मुख्य भूमिका ही तत्कालीन सरसंघचालक बाबासाहेब देवरस यांची होती. [2]

सामाजिक समरसता मंच या संघटनेची विचारप्रणाली बाळासाहेब देवरस, दत्तोपंत ठेंगडी, भिकू इदाते, रमेश पतंगे, मा.गो. वैद्य यांनी मांडली आहे. हे संघाचे जबाबदार व ज्येष्ठ कार्येकर्ते आहेत. ते संघाच्या वैचारिक भूमिकेचे समर्थन करतात.

त्यांनी सामाजिक समरसता विचार मांडला आहे. बाळासाहेब देवरस यांचे हिंदू संघटन आणि सामाजिक समता, दत्तोपंत ठेंगडी यांचे समरसते शिवाय सामाजिक समता अशक्य, दलित समस्या एक विचार, आपल्या समाजाचे भवितव्य, आपले बाळासाहेब, तिसऱ्या पर्यायोडके, भि.रा.इदाते यांचे मंडळ आयोग एक चिकित्सा, समरस समाज, राखीव जागा कशासाठी? कुणासाठी? रमेश पतंगे यांचे महात्मा फुले -डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजचिंतन, नामांतराचे समाजकारण हवे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि आदर्श समाज, डॉ. हेडगेवार आणि समरसतेची विचार सूत्रे, समरसतेच्या वाटेवर, विचार सेतू, मी, मनू आणि संघ, मा. गो. वैद्य यांचे हिंदू, हिंदुत्व आणि हिंदुत्ववाद, हिंदु संघटन शक्यता, आवश्यकता आणि सफलता, राष्ट्र, राज्य आणि शासन, धर्म, धर्म संप्रदाय, सांप्रदायिकता, हिंदुत्व जुने संदर्भ नवे अनुबंध या पुस्तिकांमध्ये समरसता विचार मांडलेला आहे. याखेरीज 1986 पासून सामाजिक समरसता मंच पत्रिका संघटनेच्या विचारांचा प्रसार करते.[3]

सामाजिक, आर्थिक, राजकीय व धार्मिक असे चार हिंदुत्वाचे प्रकार आहेत. त्यापैकी सामाजिक हिंदुत्व म्हणजे समरता, असे रमेश पतंगे यांचे मत आहे.[4] हिंदु समाज विविध जाती, भाषा, उपासना, पंथ यामध्ये विभागला आहे. विभाजन थांबविण्यासाठी अस्पृश्यता, विषमता, रूढी ग्रस्तता, शब्दप्रामाण्यवाद व अंधश्रध्दा दूर करण्यासाठी समाज प्रबोधन करणारी संस्था सामाजिक समरसता मंच आहे. असे रमेश पंतगे यांचे मत आहे.[5] द.बा.ठेंगडींच्या मते, सामाजिक चिंतन करणा-या लोकांना वारंवार एकत्र आणून गती देणे व समन्वय निर्माण करणे हे समरसतेचे काम आहे.

समरसता विचार जातिभेद व अस्पृश्यता या दोन मुद्यांवर मांडला जातो. संघात जातिभेद नाही. तसेच संघात अस्पृश्यता पाळली जात नाही, असा सामाजिक समरसता मंच संघटनेचा दावा आहे. दत्तोपंत ठेंगडी यांच्या मते, जातिभेद मोडा, जाती तोडा असा संघाचा कार्यक्रम नव्हता. पण 'आम्ही सर्व हिंदू आहोत' ही संघाची भूमिका होती. यामध्ये अस्पृश्यतेला मान्यता दिली नव्हती. 'सर्व हिंदू आहोत', कुठे आहे अस्पृश्यता, असे दत्तोपंत ठेंगडी यांचे मत आहे. संघात जात व अस्पृश्यता पाळली जात नाही हा मुद्या बाळासाहेब देवरस यांनी मांडला होता. त्यांचे समर्थन सामाजिक समरसता मंच संघटना करते.[6]

जातिभेद संघात पाळला जात नाही. या मुद्याचा सामाजिक समरसता मंच प्रचार करतो. हा मुद्या संघात पटवून देण्यासाठी चातुर्वण्य हा गुण आहे, असे मत मांडले जाते. या खेरीज कनिष्ठ जातीतून वरच्या जातीत प्रवेश दिला जातो व आंतरजातीय विवाह हे आर्थिक दर्जाप्रमाणे होतील असे ही मुद्ये मांडले जातात. हिंदू लोकांच्या समाजाची धारणा करणारा चातुर्वण्य हा एक घटक आहे. बाळासाहेब देवरसांच्या मते, चातुर्वण्य म्हणजे व्यवस्थेचे वर्गीकरण होय. हे वर्गीकरण सुरूवातीला जन्मावरून केलेले नव्हते. मात्र विशाल लोकसंख्या असलेलया देशातील लोकांच्या गुणांची परीक्षा घेणे शक्य नव्हते. त्यामुळे जन्माने गुण येतात अशी भूमिका घेतली असावी. या व्यवस्थेत भेद नव्हते. पाय मांडया, हात व तोंड हे शरीराचे अवयव श्रेष्ठ व कनिष्ठ नाहीत. ही व्यवस्था नीट ठेवण्यासाठी ज्ञानशक्ती, दंडशक्ती व धनशक्ती यांना एकमेकांची जोड दिली नाही. त्यांच्यात नियंत्रण व समतोलाचे तत्व स्वीकारले गेले. ही भव्य कल्पना त्यांच्या वंशजांना नीट चालवता आली नाही. तिच्यात दोष निर्माण झाले. जातीभेद, रोटी-बेटी बंदी व अस्पृश्यता (स्पर्शबंदी) हे हिंदू समाजात दोष वाढले. मात्र ही विषमता हिंदू समाजाचे विघटन करते. हे दोष हिंदू समाजातून काढून टाकण्यातून हिंदू समाज एकरस होईल असे बाळासाहेब देवरस यांचे मत आहे.[7]

द.बा.ठेंगडी, रमेश पतंगे यांनी वर्णभेद, जातीभेद व अस्पृश्यता पाळली जात नाही. असा विचार मांडला आहे.[8] रमेश पतंगेच्या मते, संघात अस्पृश्यता पाळली जात नव्हती परंतु संघाच्या बौध्दिकात फुले, आंबेडकरांचे जीवन, कार्य व विचार यांना स्थान नसे. संघात व संघपरिवारात दलितांची संख्या कमी होती. त्यामुळे संघात संपूर्ण समाजाचे दर्शन घडत नव्हते. म्हणून वर्णभेद, जातिभेद व अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी समरसता हा विचार मांडला गेला.

**समारोप:**

सामाजिक समरसता मंच ही आदिवासी, दलित, भटके विमुक्त यांना कृतिप्रवण केले आहे. सामाजिक समरसता मंच संघटनेने दलित समाजातील नवबौध्दांचे संघटन केले. नवबौध्द समाजाच्या कृतिप्रवणतेचा प्रयोग यशस्वी झाला नाही. परंतु गंगाधर पानतावणे, बाळासाहेब गायकवाड, केशव मेश्राम असे नवबौध्द नेते सामाजिक समरसता मंच संघटनेच्या कार्यक्रमांना उपस्थित होते. त्यामुळे सामाजिक समरसता मंच संघटना दलित जातीय स्वीकारली जाण्यात मदत झाली. आदिवासी, दलित व भटके विमुक्त जाती, वर्ण व जाती व्यवस्थेच्या समर्थनातून हिंदू ओळख स्वीकारतात. ही हिंदुत्व स्वीकारण्याची एक बाजू आहे. दुस-या बाजूने या संघटनांचे हिंदु विरूध्द मुस्लिम व ख्रिस्ती मिशनरी, धर्मांतर, राम, राममंदिर, हनुमान मंदिर यासारखे धार्मिद मुद्दे उठवून जनसमूहाला कृतिप्रवण केले आहे. म्हणजेच धार्मिक हिंदुत्वाचा मुद्या राजकीय

क्षेत्रात वापरला आहे. निवडणूकीच्या राजकारणाशी धार्मिक हिंदुत्वाचा मुद्दा राजकीय क्षेत्रात वापरला आहे. निवडणुकीच्या राजकारणाशी धार्मिक हिंदुत्वाची सांगड घातली आहे. यामुळे राजकारणात या मार्गांनी हिंदू धर्म प्रवेश करत आहे.

**संदर्भ:**

1) प्रभुणे गिरीश, विचार संस्थारूपात प्रकट होताना, पतंगे रमेश, अमृतपथ, पृ.160-161

2) पतंगे रमेश, पू.डॉक्टरांच्या शब्दांत संघस्थापनेचा इतिहास, साप्ताहिक राष्ट्रशक्ती, दि. 16 मार्च 1953, पृ.167-168

3) पतंगे रमेश, परिचर्चा हेतू व सर्मरसता मंच, सामाजिक समरसता मंच, पत्रिका, मुंबई, 15 नाव्हेंबर, 1998, पृ.7

4) पतंगे रमेश, हिंदुत्वाचा सामाजिक आशय, सामाजिक समरसता प्रतिष्ठान, मुंबई, 1994, पृ.7

5) पतंगे, कित्ता, 1998, पृ.122

6) देवरस बाळासाहेब, सामाजिक समता व हिंदू संघटन, भारतीय विचार साधना, पुणे, 1988, पृ.15, ठेंगडी दत्तोपंत, सामाजिक समरसता हवीच, विचार यात्रा, पुणे, पृ.54-60 (प्रकाशन वर्ष छापले नाही.)

7) देवरस, कित्ता, पृ.14, 21

8) ठेंगडी कित्ता, पृ.39, पतंगे कित्ता, 1998, पृ.24, 31